-११९-

पुराचा संभाव्य धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आंत कोणतीही बांधकामे न होण्याच्या दृष्टीने पूररेषेची आखणी करण्याबाबत -

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्र. सीएफएल् २७८९/प्र.क्र. ३३१/म-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ४. १०. १९८९.

## - प रि प त्र क -

दरवर्षी पावसाळ्यात नद्यांना येणा-या पुरामुळे नदीच्या काठावरील अनेक घरे वाहून जातात. तसेच, अनेक व्यक्ती प्राणास मुकतात व फार मोठ्या प्रमाणात वित्तीय हानी देखील होते. ह्या वर्षी जुलै महिन्यात उद्‌भवलेल्या पुरामुळे महाराष्ट्र राज्यात फार मोठ्या प्रमाणात हानी झाली. ब-याचशा शहरांमध्ये/गावांमध्ये नदी किना-यावरील घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. अशा पडझड झालेल्या घरांची पुनर्बांधणी करण्याचे काम शासनाने तातडीने युध्दपातळीवर हाती घेतले आहे. तथापि, कायम स्वरुपाची व्यवस्था म्हणून अशा संभाव्य पुराचा धोका असणा-या शहरे/गावांमध्ये पुराचा धोका टाळण्यासाठी पूररेषेच्या आत कोठल्याही प्रकारचे बांधकाम होणार नाही हे पाहण्याचे शासनाचे धोरण आहे.

२. उपरोक्त धोरण लक्षांत घेऊनच पाटबंधारे विभागाने त्यांच्या शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू १०८९/२४३/८९/सिं. व्य. [कामे], दिनांक २. ९. १९८९ अन्वये पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांना संबंधित शहरात/गावांत पूररेषा आखून देण्याबाबत आदेश दिलेले आहेत [प्रत जोडली आहे].

३. सर्व जिल्हाधिका-यांना या परिपत्रकाद्वारे असे आदेश देण्यांत येतात की, त्यांनी त्यांच्या जिल्ह्यातील पुराचा धोका असणा-या शहरांमध्ये/गावांमध्ये पुराचा धोका टाळण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या संबंधित अधिका-यांशी संपर्क साधून पूररेषा तातडीने आखून घ्याव्यात. ही कार्यवाही करण्याकरिता ३० ते ४० वर्षांवर पावसाच्या नोंदींची तसेच पूर्वी आलेल्या पुरांचीही माहिती पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांना लागते. ही माहिती मिळविण्याकरिता कित्येक वेळा "इंडियन मेट्रॉलॉजी डिपार्टमेंट" यांच्याकडे जाऊन मदत घ्यावी लागते. तर कित्येक वेळेस महसूल खात्याच्या अखत्यारीतील पर्जन्य मापनाच्या नोंदींचीही माहिती लागते. प्रत्येक गावामधील पूररेषा ~~मक~~ काढण्याकरिता विस्तृत प्रमाणावर पावसाची व आतापर्यंतच्या पुरांची माहिती गोळा करुन नदीच्या पात्रातील व गावातील सर्वेक्षण मोठ्या प्रमाणात करावे लागते. या सर्व गोष्टींकरिता जिल्हाधिका-यांनी संबंधित पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांना मदत करणे आवश्यक आहे. अशी मदत त्यांना देण्याबाबत शासन या परिपत्रकाद्वारे आदेश देत आहेत.

४. जुलै १९८९ मधील नैसर्गिक आपत्तीमुळे ज्यांची घरे पडली आहेत अशा आपद्‌ग्रस्तांना अन्य ठिकाणी भूखंड देऊन तेथे नवीन घरे बांधून द्यावयाची आहेत. अशा आपद्‌ग्रस्तांकरिता तयार होत असलेल्या वसाहतीकरिता लागणा-या लॅन्ड

लेव्हलिंगची [जमीन सपाटीकरण व विकास] कामे जेथे करावयाची आहेत त्या ठिकाणी संबंधित अधीक्षक अभियंत्यांशी जिल्हाधिकाऱ्यांनी संपर्क साधून पाटबंधारे विभागाची तांतडीची कामे सांभाळून जी कामे करता येतील ती करुन घ्यावीत. मात्र, या कामासाठी होणारा खर्च हा मागणी क्रमांक सी १५-२२४५-नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य-०-२-पूर, चक्रीवादळे इत्यादी-१०१-अनुग्रह सहाय्य-[तीन] गृहनिर्माण-[सी] पुरांमुळे नुकसान पोहोचलेल्या व्यक्तींना घरे बांधून देण्यासाठी जमिनीचा विकास करण्याकरिता खर्च [२२४५-०१९१]" या उप गौण लेखाशिर्षाखाली करण्यांत यावा व तो या वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यांत यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
[ श. वि. वाडेकर ]
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,

— ३ —

शहरांमध्ये/गांवांमध्ये वरील प्रकारच्या पूररेषा आखून देण्याबाबत पाटबंधारे विभागाच्या अधिका-यांनी कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे वरील पूररेषा-साठी नकाशे तयार करतांनाही धरण सुरक्षितता संहितेच्या प्रकरण ८ मधील सूचनांचे अनुषंगाने कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ द. ल. थोरात ]
शासनाचे सहाय्यक सचिव.

प्रत -

सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय,
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंते, पाटबंधारे विभाग,
सर्व अधीक्षक अभियंते, पाटबंधारे विभाग,
सर्व कार्यकारी अभियंते, -"- ,
सर्व तांत्रिक कार्यासने / तांत्रिक अधिकारी, मंत्रालय, मुंबई.